# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं.: - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे-४११००७

संदर्भ क्रमांकः- आरक्षण/ओ-२२/४३८

दिनांकः-०३/०५/२०१३

प्रति,
मा.प्राचार्य / मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

विषयः- शासकीय / निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले / होणा-या अंध / क्षीणदृष्टी /मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचा-यांना सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भः- १. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.-अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.२, दिनांक- ०८/०२/२०१३.
२. शासन पत्र क्रमांक-अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दिनांक- २०/०२/२०१३.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासकीय / निमशासकीय सेवेतील अपंग कर्मचा-यांनी केलेल्या Scooter with Adaption च्या मागणीची पूर्तता काही अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्याचा निर्णय उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाव्दारे घेण्यात आलेला आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार पात्र अपंग कर्मचा-यांना Scooter with Adaption ची पूर्तता करण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबतचा पूर्तता अहवाल वेळोवळी शासनास सादर करण्यात यावा, व अहवालाची एक प्रत या कार्यालयाकडे देखील सादर करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबतः- वरीलप्रमाणे

MMA/MD/Document/2013/Circular

UNIVERSITY OF PUNE (General Section) 09 APR 2013 Inward No. 402

महाराष्ट्र शासन

क्रमांक :अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २०.२.२०१३

प्रति,

**सर्व सहसचिव / उपसचिव,**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

1239
17/04/13
22/04/13
(8) आरक्षण कक्ष

विषय : **शासकीय / निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले / होणाऱ्या अंध / क्षीणदृष्टी / मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत...**
**Scooter with Adaption च्या मागणीसंदर्भात...**

**महोदय,**

%

**सोबत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१२/प्र.क्र. ३२/अ.क.२, दिनांक ८.२.२०१३ ची प्रत जोडली आहे.**

शासकीय / निमशासकीय सेवेतील अपंग कर्मचाऱ्यांनी केलेल्या Scooter with Adaption च्या मागणीची पूर्तता काही अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्याचा निर्णय, उपरोक्त शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळविण्यात यावा व त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही त्वरित करुन, पात्र अपंग कर्मचाऱ्यांना Scooter with Adaption ची पूर्तता करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीबाबतचा पूर्तता अहवाल वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

**आपला,**

(8) उ.कु.(आरक्षण)
उ.कु.(प्रशासन-शिक्षकेतर)
उ.कु.(प्रशासन-शिक्षक)
21.4.2013

**( बा. म. राऊत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत त्वरित कार्यवाहीस्तव :

- संचालक, सर्व संचालनालये, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य,
- सर्व अकृषिक विद्यापीठांचे कुलसचिव, महाराष्ट्र राज्य.

17/4/13

शासकीय /निमशासकीय सेवेत नियुक्त झालेले /होणाऱ्या अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान उपकरणे उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक: अपंग २०१२/ प्र.क्र. २२/ अ.क्र. ३

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: ०८ फेब्रुवारी, २०१३.

संदर्भ:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-न्यायाग-२०११/ प्र.क्र.४/सुधार- ३, दिनांक ३ जून,२०११

२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक- अपंग-२०११/ प्र.क्र.९१/सुधार- ३, दिनांक २० जुलै,२०११

३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक- अपंग-२०११/ प्र.क्र. ९१/अ.क्र.२ दिनांक १४ फेब्रुवारी, २०१२

प्रस्तावना :- मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीने निश्चित केलेल्या उपकरणांची यादी या विभागाच्या दिनांक २०/७/२०११ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या यादीमध्ये Scooter with Adaption या उपकरणाचा समावेश आहे. अस्थिव्यंग प्रवर्गातील अनेक कर्मचाऱ्यांकडून या उपकरणाची मागणी केली जात आहे. तथापि या उपकरणाची किंमत रु.५०,०००/- पेक्षा अधिक होत असल्याने व खर्चाची ठराविक मर्यादा विहीत केलेली असल्याने ही उपकरणे खरेदी करण्यास विभागांना /कार्यालयांना अडचण येत होती. यास्तव सदर उपकरण खरेदीस संदर्भाधीन अनु.क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आली. सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे यांची मागणी केलेल्या अपंग कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश कर्मचाऱ्यांनी Scooter with Adaption या उपकरणाची केलेली मागणी विचारात घेऊन सदर स्थगिती उठविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासकीय / निमशासकीय सेवेतील Scooter with Adaption या उपकरणाची मागणी केलेल्या अपंग कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर उपकरण संबंधित विभाग/कार्यालय यांनी पुरविण्याबाबत या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे:-

१)-अ) Scooter with Adaption या उपकरणाची किंमत रु.५०,०००/- किंमतीच्या मर्यादेत असल्यास विभागाने /कार्यालयाने उपलब्ध करुन दयावे. **किंवा,**

ब) ज्या कर्मचाऱ्याकडे सदर वाहन उपलब्ध असेल व त्यांनी Adaption (Retrofit Wheel Attachments) ची मागणी केल्यास सदर Adaption उपकरण विभागाने /कार्यालयाने उपलब्ध करुन दयावे. **किंवा,**

क) Scooter with Adaption उपकरणाची किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास विभागाने/कार्यालयाने अपंगाकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या आर्थिक तरतूदीतून

रु.५०,०००/- मंजूर करावी व उर्वरित रक्कम मागणीधारक कर्मचाऱ्यास वाहन अग्रिम (Vehicle Advance) या स्वरुपात मंजूर करावे व सदर वाहन अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्याकडून समान हप्त्यात वसुल करावी.

२. Scooter with Adaption उपकरणाच्या खरेदीसंदर्भात कर्मचाऱ्याने Scooter खरेदीसाठी संबंधित एजन्सीकडून दरपत्रक घ्यावे, मात्र Adaption करीता शासनाने नियुक्त केलेल्या पुरवठादारांकडून दरपत्रक घेऊन संबंधित आस्थापनेस सादर करावे.

३. वरील उपकरणांच्या खरेदी संदर्भात रक्कम अदा करताना विभागाने /कार्यालयाने Scooter करीता तसेच Adaption करीता दोन स्वतंत्र देयकाव्दारे ती अदा करावी.

४. नवीन वाहन (Scooter) खरेदी करताना मोटार वाहन अधिनियम, १९८८ अंतर्गत अपंगांसाठी वाहन कराच्या सवलतीबाबत असलेल्या तरतूदीनुसार विभागाने /कार्यालयाने दरपत्रक तपासून देयके अदा करण्याची कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०१३०२०८१५५३२९२०२२** आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**( प्र. पां. लुबाळ )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति :-

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, हुतात्मा चौक, मुंबई (पत्राने).
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, वि.जा.भ.ज.व इ.मा.व. संचालनालय, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
कक्ष अधिकारी / आस्था-२, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग /विभागातील सर्व कार्यासन/
निवड नस्ती, का- अपंग कल्याण-२